ePaper
वर्ष - 9 । अंक -26 UDYAM-MH-26-0158827

**जग हादरलं! इस्रायलचा येमेनवर सर्वात मोठा हल्ला, आता युद्ध पेटणार?**




महाईन्यूज ™

आतील पानांत

- स्पर्धेत बहिष्कार टाकता येतो का?
- इंडियाच्या जर्सीवर APOLLO चा लोगो
- अमेरिकेने मध्यस्थी केली होती का?
- महिला अधिकाऱ्याच्या घरी छापा

www.mahaenews.com । बुधवार, दि. 17 सप्टेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**मुंबई महापालिका निवडणूक** मुंबईच्या विकासाचे व्हिजन, लिहून घ्या..रेकॉर्ड करा...

# काहीही झालं तरी मुंबई जिंकणारच!

## प्रचाराचा श्रीगणेशा: मुंबईत महायुतीचंच सरकार, महापौरपदावर फडणवीसांचं मोठं विधान!

। मुंबई । प्रतिनिधी । महाईन्यूज

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई महापालिका निवडणुकीसाठी प्रचाराचा श्रीगणेशा केला आहे. त्यांनी आज आपल्या भाषणात उद्धव ठाकरे यांच्यावर सडकून टीका केली. तसेच मुंबईच्या विकासाचे व्हिजन मांडले. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात मोठ्या घडामोडी घडत आहेत. या निवडणुकीत मुंबई पालिकेची निवडणूक जिंकण्यासाठी सर्वच पक्ष कामाला लागले आहेत. काहीही झालं तरी आम्हीच मुंबई जिंकणार, असा विश्वास प्रत्येकाकडून व्यक्त केला जात आहे. असे असतानाच आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अखेर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचे रणशिंग फुंकले आहे. त्यांनी माझे विधान रेकॉर्ड करा, काहीही झालं तरी मुंबईत महायुतीचंच सरकार येणार, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला..




**फडणवीस नेमकं काय म्हणाले?**

देवेंद्र फडणवीस आज मुंबईत भाजपाच्या विजयी संकल्प मेळाव्यात बोलत होते. या कार्यक्रमाला फडणवीस यांच्यासोबतच भाजपाचे इतरही महत्त्वाचे नेते उपस्थित होते.

यावेळी बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर सडकून टीका केली. ठाकरे मुंबईच्या विकासावर बोलत नाहीत. त्यांच्याकडे विकासाबद्दल बोलण्यासाठी काहीच नाही, असा टोला फडणवीस यांनी लगावला.

**व्हिडीओ रेकॉर्ड करा, जपून ठेवा**

तसेच पुढे बोलताना त्यांनी महायुतीवरही भाष्य केलं. त्यांनी माध्यमांना उद्देशून आज माझे शब्द लिहून घ्या. व्हिडीओ रेकॉर्ड करा.

तो जपून ठेवा आणि नंतर सगळीकडे दखवा की काहीही झालं तरी मुंबईच्या महापालिकेच्या निवडणुकीत महायुतीचाच झेंडा फडकणार आहे. काहीही झालं तरी मुंबई पालिकेवर महायुतीचंच सरकार येणार, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

**आम्ही धारावीच्या दहा लाख लोकांना...**

मुंबईच्या गिरणगावात राहणारा मराठी माणूस आज वसई विरार, कर्जतकडे फेकला गेला आहे. आम्ही मात्र बीडीडी चाळीचा पुनर्विकास केला. म्हाडाच्या माध्यमातून मराठी माणसाला हक्काचे घर देण्याचा आमचा प्रयत्न आहे. ज्यांच्या हाती मुंबईची सत्ता होती त्यांना स्वप्नही बघता येत नव्हते आणि लोकांचे स्वप्नही पूर्ण करता येत नव्हते, असे म्हणत फडणवीस यांनी ठाकरे यांना टोला लगावला. मुंबईतील धारावी प्रकल्पावरही त्यांनी भाष्य केले. आम्ही धारावीच्या दहा लाख लोकांना घर देत आहेत. या सर्व लोकांना धारावीतच घर देण्यात येणार आहे. प्रत्येकाला घर देणारा आमचा हा प्रकल्प आहे, असे सांगत त्यांनी आमचे सरकार मुंबईच्या विकासासाठी प्रयत्न करत असल्याचा दावा फडणवीस यांनी यावेळी केला.

**ब्रँडचा बँड-बाजा वाजला**

बेस्ट पतपेढीच्या निवडणुकीत शिवसेना ठाकरे गट आणि मनसेच्या पॅनलचा एकही उमेदवार निवडून आला नव्हता. या निवडणुकीपूर्वी राज आणि उद्धव ठाकरे यांनी ही युती म्हणजे ठाकरे ब्रँड असं बोललं जात होतं. यावर बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, बेस्टची निवडणूक होती, आम्ही सांगितलं कशाला पक्षावर लढायचं. पण काहीजण म्हणाले आमचा ब्रँड आहे. आमचे शशांक राव, प्रवीण दरेकर आणि प्रसाद लाड यांनी ब्रँडचा वाजवला बँड, बँड-बाजा वाजला अशा शब्दात ठाकरेंवर सडकून टीका केली आहे.

## शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे...

फडणवीस म्हणाले की, हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे हा ब्रँड होता, तुम्ही ब्रँड नाहीत. नुसतं नाव लावल्याने कुणी ब्रँड होत नाही. आमचा कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. त्यामुळे आमच्याकडे चहा विकणारा जगामध्ये जागतिक ब्रँड म्हणून जगात स्थापित झाला आहे. अशा प्रकारचा ब्रँड निर्माण करणारा आमचा पक्ष आहे. त्यामुळे आम्हाला कुणी ब्रँड साबू नये. जगातला सर्वात मोठा ब्रँड आमच्याकडे आहे. त्याचं नाव नरेंद्र दामोदरदास मोदी आहे.

## सेवा पंधरावडा

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीतीत आज उद्घाटन...

# सेवा पंधरावडा उपक्रमाची पुण्यातून सुरुवात!

## जलद आणि सोपा लाभ मिळणार

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्याच्या महसूल आणि वन विभागामार्फत येत्या बुधवारपासून (१७ सप्टेंबर) सेवा पंधरवडा अभियान राबविण्यात येणार असून, त्याचा प्रारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पुण्यातून होणार आहे. या सेवा पंधरावड्यात महसूल विभागामार्फत अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना मदत निधीचे वितरण, प्रलंबित फेरफार नोंदीचा निपटारा, नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र, मतदार नोंदणी, आधारकार्ड सुविधा दिल्या जाणार आहेत. येत्या दोन ऑक्टोबरपर्यंत हा उपक्रम सुरू राहणार आहे.**




या अभियानाचा उद्घाटन समारंभ गणेश कला क्रीडा रंगमंच येथे होणार आहे. महसूल, ग्रामविकास, नगररचना, आरोग्य, ऊर्जा, सामाजिक न्याय, महिला आणि बालकल्याण तसेच आदिवासी विभागाच्या विविध सेवा नागरिकांच्या दारात पोहोचविणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या उपक्रमासाठी युद्धपातळीवर काम करण्याचे आदेश राज्य शासनाने दिले आहेत.सेवा पंधरावड्यात महसूल विभागामार्फत अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना मदत निधीचे वितरण, प्रलंबित फेरफार नोंदीचा निपटारा, नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र, मतदार नोंदणी, आधारकार्ड सुविधा दिल्या जाणार आहेत. ग्रामविकास आणि नगर प्रशासन विभागामार्फत मालमत्ता नोंद, नळजोडणी, विवाह नोंदणी, जन्म-मृत्यू नोंदी आणि प्रमाणपत्र वितरण, मालमत्ता कर आकारणी या सेवा उपलब्ध करून दिल्या जातील.आदिवासी विकास विभागाकडून बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेत सिंचन विहिरींची नोंदणी तसेच अनुसूचित जमातींना प्रलंबित वनहक्क पट्टे दिले जाणार आहेत. सामाजिक न्याय विभागाकडून दिव्यांग प्रमाणपत्र तर आरोग्य विभागाकडून लसीकरणासह विविध आरोग्य सेवा पुरविल्या जाणार आहेत. महिला आणि बालकल्याण तसेच कौशल्य विकास विभागाच्या माध्यमातून महिला बचत गटांना रोजगारसंधी, राखी किट वाटप, रोजगार मेळावे आणि प्रशिक्षित उमेदवारांना रोजगार देण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.या सेवांच्या अंमलबजावणीसाठी तीन टप्पे निश्चित करण्यात आले आहेत. पहिल्या टप्प्यात (१७ ते २२ सप्टेंबर) पाणंद आणि शिवार रस्त्यांचे क्रमांकन, नोंदणी, मोजणी आणि सीमांकनासह वाद मार्गी लावण्यासाठी रस्ता अदालतीचे आयोजन करण्यात येईल.

दुसऱ्या टप्प्यात (२३ ते २५ सप्टेंबर) सर्वांसाठी घरे या उपक्रमाअंतर्गत सरकारी जमिनीवर घरकुलांसाठी कब्जहक्क, झोपडपट्टी किंवा अतिक्रमण नियमितीकरण तसेच पात्र लाभार्थ्यांना पट्टे वाटप होईल.

तिसऱ्या टप्प्यात (२८ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर) जिल्हाधिकारी स्थानिक परिस्थिती विचारात घेऊन नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या सर्व सेवांसाठी संबंधित अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.या अभियानाचा उद्घाटन समारंभ गणेश कला क्रीडा रंगमंच येथे होणार आहे. महसूल, ग्रामविकास, नगररचना, आरोग्य, ऊर्जा, सामाजिक न्याय, महिला आणि बालकल्याण तसेच आदिवासी विभागाच्या विविध सेवा नागरिकांच्या दारात पोहोचविणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या उपक्रमासाठी युद्धपातळीवर काम करण्याचे आदेश राज्य शासनाने दिले आहेत.सेवा पंधरावड्यात महसूल विभागामार्फत अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना मदत निधीचे वितरण, प्रलंबित फेरफार नोंदीचा निपटारा, नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र, मतदार नोंदणी, आधारकार्ड सुविधा दिल्या जाणार आहेत. ग्रामविकास आणि नगर प्रशासन विभागामार्फत मालमत्ता नोंद, नळजोडणी, विवाह नोंदणी, जन्म-मृत्यू नोंदी आणि प्रमाणपत्र वितरण, मालमत्ता कर आकारणी या सेवा उपलब्ध करून दिल्या जातील. विभागाकडून बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेत सिंचन विहिरींची नोंदणी तसेच अनुसूचित जमातींना प्रलंबित वनहक्क पट्टे दिले जाणार आहेत. सामाजिक न्याय विभागाकडून दिव्यांग प्रमाणपत्र तर आरोग्य विभागाकडून लसीकरणासह विविध आरोग्य सेवा पुरविल्या जाणार आहेत.

### वाद मार्गी लावण्यासाठी अदालती

महिला आणि बालकल्याण तसेच कौशल्य विकास विभागाच्या माध्यमातून महिला बचत गटांना रोजगारसंधी, राखी किट वाटप, रोजगार मेळावे आणि प्रशिक्षित उमेदवारांना रोजगार देण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.या सेवांच्या अंमलबजावणीसाठी तीन टप्पे निश्चित करण्यात आले आहेत. पहिल्या टप्प्यात (१७ ते २२ सप्टेंबर) पाणंद आणि शिवार रस्त्यांचे क्रमांकन, नोंदणी, मोजणी आणि सीमांकनासह वाद मार्गी लावण्यासाठी रस्ता अदालतीचे आयोजन करण्यात येईल.

# ग्रामस्थांच्या पुढाकारातून पाणंद रस्ते मुक्त

## शेतकऱ्यांनी एकत्र येत पाणंद रस्ते तयार करण्याचे केले काम

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**गावकीने एकत्र येऊन आपापल्या जागा पाणंद रस्त्यांसाठी सोडल्याचे आदर्श उदाहरण पुणे जिल्ह्यातील आडाचीवाडी या गावाने घालून दिले आहे. आडाचीवाडी ग्रामस्थांनी पुढाकार घेऊन स्वतःच्या जमिनी रस्त्यांसाठी देण्याबरोबरच श्रमदान करून रस्ते उभारणी केली आहे. या कामाची दखल राज्य शासनाकडूनही घेण्यात आली आहे.**




आडाचीवाडीचे माजी उपसरपंच सूर्यकांत पवार यांनी त्याबाबतची माहिती मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली. आडाचीवाडी, वाल्हे गावाचे माजी सरपंच दत्तात्रय पवार, तंटामुक्त गाव समिती अध्यक्ष हनुमंत पवार, सामाजिक कार्यकर्ते नामदेव पवार, अनिल पवार, सचिन पवार, अरविंद पवार, दिलीप पवार, अभिजित पवार या वेळी उपस्थित होते. गावकऱ्यांनी एकत्र बसून पाणंद रस्ते खुले करण्याबाबत एक बैठक घेत शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. आपापसातील वाद दूर करून सर्वांनी एकमताने १५ पाणंद रस्ते खुले करण्याचे निश्चित केले. या सर्व १५ पाणंद रस्त्यांची रोव्हरद्वारे मोजणी करून जिओ रेफरन्सिंग करण्यात आले आणि त्याचे नकाशे तयार करण्यात आले असून, ग्रामसभेमध्ये सर्वानुमते ठराव करून रस्त्यांची नोंद ७/१२ उताऱ्यावर घेण्यासाठी पुरंदरचे तहसीलदार यांना अहवाल सादर करण्यात आला.सर्व रस्ते ज्या सर्व्हे नंबरमधून जातात त्या ४३२ जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर फेरफार घेऊन इतर अधिकारांत रस्त्यासाठी ग्रामस्थांची वहिवाट अशी नोंद घेण्यात आली आहे. या कामाची दखल घेऊन राज्य सरकारने गावाचा विशेष सन्मान केला आहे, असे सूर्यकांत पवार यांनी सांगितले.

### रस्त्यासाठी ग्रामस्थांची वहिवाट

आडाचीवाडीचे माजी उपसरपंच सूर्यकांत पवार यांनी त्याबाबतची माहिती मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली. आडाचीवाडी, वाल्हे गावाचे माजी सरपंच दत्तात्रय पवार, तंटामुक्त गाव समिती अध्यक्ष हनुमंत पवार, सामाजिक कार्यकर्ते नामदेव पवार, अनिल पवार, सचिन पवार, अरविंद पवार, दिलीप पवार, अभिजित पवार या वेळी उपस्थित होते.

## मिशन महापालिका निवडणूक : सोसायटीधारकांची ठाम भूमिका

# “आम्हाला पाणी नाही तर प्रचारासाठी ‘एन्ट्री’सुद्धा नाही!

## लोटस नंदनवन सोसायटीची आक्रमक भूमिका, हंडा मोर्च्याचा इशारा

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**“पाणी नसेल तर प्रचारासही नो एन्ट्री!” असा थेट इशारा देत मोशीतील लोटस नंदनवन सोसायटीने आता आंदोलनाची हाक दिली आहे. मुसळधार पावसाच्या सरी सुरु असतानाही, या सोसायटीतील रहिवाशांना दररोज चार ते पाच टँकरने पाणी विकत घ्यावे लागत आहे. गेली पाच वर्षे हेच चालू आहे, आणि आता सहनशक्तीचा बांध तुटला आहे.**



महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडे शेकडो वेळा तक्रारी करूनही काहीच उपयोग झाला नाही. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या ढिसाळ, नियोजनशून्य आणि उदासीन कारभारामुळे नागरिकांच्या मूलभूत गरजांवरही गदा येत आहे.

पाणीपुरवठ्याचा आढावा घेण्यासाठी फेडरेशनचे अध्यक्ष श्री. संजीवन सांगळे यांनी महापालिकेचे कनिष्ठ अभियंता श्री. चेतन देवरे यांना थेट सोसायटीत आणून वस्तुस्थिती दाखवली. पाहणीनंतर चेतन देवरे यांनी, “दोन-तीन दिवसांत नियमानुसार पाणी मिळेल” असे आश्वासन दिले, मात्र अशा आश्वासनांचे आतापर्यंत कुठलेही फलित न दिसल्यामुळे नागरिक आता चिडले आहेत.

> “पिंपरी चिंचवड शहर स्मार्ट सिटी म्हणून गाजवले जात असले तरी काही भागांत लोकांना पावसाळ्यात सुद्धा पैसे देऊन पाणी विकत घ्यावं लागतं हे दुर्दैवी आहे. जर पाणीपुरवठा सुरळीत झाला नाही तर हंडा मोर्चा निघणारच आणि कोणत्याही पुढाऱ्याला निवडणुकीत सोसायटीत पाय ठेवू दिला जाणार नाही.”

“धरणे तुडुंब भरली, पावसाचा जोर कायम, आणि तरीही आम्हाला पाणी नाही? हे कसले स्मार्ट सिटी मॉडेल?” असा संतप्त सवाल सोसायटीधारकांनी उपस्थित केला आहे.

**पाणी नसेल, तर पुढाऱ्यांना नो एन्ट्री!**

लोटस नंदनवन सोसायटीतील नागरिकांनी स्पष्ट शब्दांत सांगितले आहे की, “जर पुढील चार-पाच दिवसांत पाणीपुरवठा सुरळीत झाला नाही, तर कोणत्याही पक्षाच्या कोणत्याही नेत्याला सोसायटीमध्ये प्रचारासाठी येऊ दिले जाणार नाही.” हा निर्णय एका सामूहिक बैठकीत घेण्यात आला आणि या निर्णयाला संपूर्ण सोसायटीचा पाठिंबा आहे.

**हंडा मोर्च्याचा इशारा...**

चिखली-मोशी-चऱ्होली-पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशनच्या नेतृत्वाखाली, पाणीपुरवठा बंद झाल्यास महापालिकेवर हंडा मोर्चा नेण्याचा इशारा देण्यात आला आहे. महिलांचा सहभाग ठळक असणार असून, या आंदोलनात हजारोंच्या संख्येने रहिवासी सहभागी होणार आहेत.

# शहरात पावसाच्या संततधारेने रस्ते जलमय

## जनजीवन विस्कळीत ; पवना धरणातून पाण्याचा विसर्ग सुरु

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवडमध्ये सलग चार ते पाच दिवसांपासून बरसत असलेल्या पावसाने जनजीवन विस्कळित झाले. गेले दोन दिवस शहरात संततधार सुरू होती. तर मंगळवारी पहाटे पासूनच पावसाने जोर धरला असून दुपारपर्यंत तो कायम होता. दुपारनंतर पावसाने उघडीप दिली. सकाळी कामानिमित्त व कार्यालयात जाण्यासाठी घराबाहेर पडणारे कर्मचारी तसेच शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांची तारांबळ उडाली. अनेकांनी पावसामुळे चारचाकी वाहनांनी प्रवास करणे पसंत केल्याने सकाळी काही भागात वाहतूक कोंडीही झालेली दिसून आली. सतत पाऊस सुरू असल्यामुळे शहरातील बहुतेक रस्ते जलमय झाले आहेत..**



अनेक ठिकाणी खड्डे पडल्यामुळे त्यातून मार्ग काढणे नागरिकांना जिकरीचे ठरत होते. दुपारी तीन वाजल्यानंतर पावसाने काहीशी विश्रांती घेतली, तरी ढगाळ हवामान व तुरळक पडणाऱ्या सरींमुळे वातावरणात गारवा होता.

**पवना धरण १०० टक्के भरले**

शहराप्रमाणेच मावळातही पावसाने हजेरी लावल्याने पवना धरण शंभर टक्के भरले. त्यामुळे धरणातून एक हजार क्युसेक्सने विसर्ग करण्यात येत आहे . धरणातून सोडण्यात येणारे पाणी व पिंपरी, चिंचवड, निगडी, आकुर्डी, रावेत, थेरगाव, सांगवी, पिंपळे निलख, पिंपळे गुरव, भोसरी या भागातही झालेल्या जोरदार पावसामुळे पवना नदीच्या पाणीपातळीत काही प्रमाणात वाढ झालेली दिसून आली.

**देहूरोड रस्त्यांवर अनेक ठिकाणी खड्डे**

देहू परिसरात गेले दोन दिवस पावसाने हजेरी लावली आहे. त्यामुळे जनजीवन विस्कळित झाले आहे. या वर्षी ७ मे रोजी पावसाने हजेरी लावली. त्यानंतर सतत पाऊस पडत आहे. जून महिन्यात पेरणीसाठी पाऊस उघडला नाही. काही शेतकरी यांनी सोयाबीन पेरले. मात्र, आता सोयाबीनचे पीक ही पावसाच्या पाण्यात आहे. त्यामुळे शेतकरी काळजीत आहे. रविवारी दुपारी मुसळधार पाऊस पडू लागला. गेल्या चार दिवसात पावसाने हजेरी लावली. त्यामुळे शेतात पाणी साचले. देहू येलवाडी देहूरोड रस्त्यांवर अनेक ठिकाणी खड्डे पडले. त्यात पाणी साचले. परंडवाल चौकात तळे निर्माण झाले आहे. तसेच पालखी मार्गावर वाहतूक कोंडी झाली.

**मावळात भातलावणीला अडथळा**

मावळात यावर्षीची भातलावणी उरकली आहे. तसेच भातपिकासाठी आवश्यक असणारा जोरदार पाऊस पडला आहे. भात रोपेही जोमाने उगवली आहेत. मावळातील धरणे तुडुंब भरली आहेत. त्यामुळे सध्याची पावसाची रिपरिप मावळकरांना नकोशी झाली आहे. मागील आठवड्यात पावसाने उघडीप दिली होती. तसेच मावळात सकाळच्या वेळी दाट धुके देखील दिसत होते. त्यामुळे थंडीला सुरवात झाली असे वाटू लागले असतानाच रविवारी रात्री विजेच्या कडकडाटासह पावसाला सुरवात झाली. काहीकाळ विश्रांती घेतलेल्या पावसाने पुन्हा रस्ते निसरडे झाले. त्यातच वातावरणातील बदलाने अनेकजण आजारी पडत असल्याचे दिसत आहे.

### लोणावळ्यात अधिक पावसाची नोंद

लोणावळ्यात मागील वर्षीपेक्षा अधिक पावसाची नोंद झाली आहे. मागील दोन दिवसांपासून थांबून-थांबून पाऊस सुरूच आहे. लोणावळा आणि परिसरात या वर्षी मेपासूनच सातत्याने पाऊस सुरू आहे. गेल्या आठवड्यात तीन दिवस उघडीप दिली. त्यानंतर पावसाचा जोर काहीसा कमी असल्याने नागरिक सुखावले होते. मात्र, आता मागील दोन दिवसांपासून जोरदार पाऊस होत आहे. याचा परिणाम दैनंदिन कामकाजावर होत आहे. सोमवारी सकाळीदेखील १६ मिमी पावसाची नोंद झाली. याशिवाय परिसरातील खंडाळा, कुसगाव बु., कार्ला परिसरातही पाऊस होत आहे. यामुळे नदी-नाले प्रवाहित असून, इंद्रायणी नदीदेखील तुडुंब भरली आहे. दरम्यान, गेल्या वर्षी संपूर्ण हंगामात लोणावळ्यात सहा हजार ६१३ मिलिमीटर (२३६.७३ इंच) पावसाची नोंद प्रशासनाने केली आहे. लोणावळ्यात १६ सप्टेंबरपर्यंत ५,५२३ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे.



## भूमिका

# आत्मनिर्भर भारताचे शिल्पकार

**नरेंद्र मोदी यांनी भारताला केवळ आर्थिक आणि राजकीयदृष्ट्याच नाही, तर मानसिक आणि सांस्कृतिकरीत्याही सामर्थ्यवान केले आहे. गेल्या ११ वर्षांत त्यांच्या नेतृत्वाखाली देशाने स्वाभिमान, स्वावलंबन आणि आत्मविश्वासाची जी नवीन उंची गाठली आहे, ती ऐतिहासिक आणि अद्वितीय आहे.**

इतिहासात १७ सप्टेंबर हा दिवस अनेक कारणांनी महत्त्वाचा आहे. आजच्या दिवशी सर्व शिल्पकार बांधव आणि कामगार वर्ग अतिशय उत्साहात विश्वकर्मा जयंती साजरी करतात. आजच्याच दिवशी हैदराबादला क्रूर निजाम आणि रझाकारांपासून मुक्ती मिळाली होती आणि आजच्याच दिवशी एका अशा जनसेवकाचा जन्म झाला, ज्याने आपले संपूर्ण आयुष्य देश आणि देशवासीयांना समर्पित केले. तो जनसेवक म्हणजे आपले पंतप्रधान नरेंद्र मोदीजी. मोदीजींचा हा जन्मदिवस विशेष आहे कारण हा त्यांचा ७५ वा जन्मदिवस आहे. १४० कोटी देशवासीयांच्या वतीने मोदीजींना जन्मदिवसाच्या मन:पूर्वक शुभेच्छा देतो आणि ईश्वराकडे प्रार्थना करतो की भारताच्या मजबूत भविष्याकरिता मोदीजींना दीर्घायुष्य, ऊर्जा आणि आरोग्य लाभो. अनेक दशकांपासून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत काम करताना



मला याचा अनुभव आला की त्यांचे व्यक्तिमत्त्व एका राजकीय नेत्यापेक्षाही राष्ट्रहिताला समर्पित असलेल्या ध्येयनिष्ठ नेतृत्वकर्त्याचे आहे. असे नेतृत्वकर्ते ज्यांच्या नेतृत्वाच्या मुळाशी राष्ट्राचे उत्थान आणि जनतेचे कल्याण ध्येयवाक्याप्रमाणे रुजलेले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाचे हे वैशिष्ट्य आहे की त्यांच्याकडे समाजातील सर्व स्तरांचा सहभाग आपल्या शासनामध्ये सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक दूरदृष्टी आहे. समाजातील कोणताही वर्ग किंवा व्यक्ती विकासापासून वंचित राहू नये, या उद्देशाने धोरणांचे नियोजन आणि अंमलबजावणी यावर त्यांचा भर असतो. ते शासनाला सत्तेचे साधन नाही, तर सेवेचे माध्यम मानतात. याच कारणामुळे त्यांच्या सरकारमध्ये गरीब-कल्याणाला केंद्रस्थानी ठेवून अनेक योजना केवळ सुरूच झाल्या नाहीत, तर त्यांनी यशस्वीपणे आपले उद्दिष्ट साध्यही केले आहे.आपण पाहू शकतो की जनधन योजनेने ५० कोटींपेक्षा जास्त लोकांना बँकिंग व्यवस्थेशी जोडून आर्थिक समावेशनाचे एक नवीन पर्व सुरू केले; उज्वला योजनेने घरोघरी धुरापासून मुक्ती आणि सन्मानजनक जीवनाचा संदेश पोहोचवला; आयुष्मान भारतने गरिबांना आरोग्याची सुरक्षा दिली,

तर त्याच वेळी प्रधानमंत्री आवास योजनेने गरीब वर्गाला स्वत:च्या घराचे स्वप्न पूर्ण करण्याची संधी दिली. मी अशा योजनांच्या कोणत्याही लाभार्थ्याच्या डोळ्यांत समाधान आणि विश्वास पाहतो, तेव्हा मला समजते की मोदींचे शासन जन कल्याणाच्या उद्दिष्टाला कशा प्रकारे प्रत्यक्षात साकार करत आहे.राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक म्हणून त्यांनी देशाच्या अनेक भागांमध्ये समाजातील प्रत्येक वर्गासोबत संवाद साधला. त्यांच्या तपस्वी जीवनाचा हा तो काळ होता, ज्यात त्यांनी देशाचा आत्मा केवळ जवळून पाहिलाच नाही, तर ते त्याच्या आंतरिक शक्तीशी परिचित झाले. त्यांचा हा अनुभव त्यांच्या शासनाच्या धोरणांमध्ये आणि कार्यशैलीमध्ये गरीब-वंचितांप्रति संवेदनशीलतेच्या रूपात दिसून येतो. संघाचे प्रचारक म्हणून काम करताना मोदीजी संघटन कौशल्य शिकले आणि नंतर भाजपचे संघटन शिल्पकार म्हणून त्यांनी संघटन कार्य काळानुरूप बनवण्यासाठी अनेक यशस्वी सुधारणा तसेच प्रयोग केले. मी स्वत:ला भाग्यवान समजतो की भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून कार्यरत असताना मला मोदीजींचे मार्गदर्शन तसेच त्यांचा संघटनात्मकसंधी मिळाली. कठीण परिस्थितीत निर्णय घेण्याच्या क्षमतेवरूनच मजबूत नेतृत्वाची ओळख पटते. या बाबतीत मोदीजींची नेतृत्व क्षमता वेगळ्याच पोलादी धाटणीची आहे. मी अनेकदा पाहिले आहेत्यांचे असाधारण धैर्य आणि स्पष्ट दृष्टिकोन असतो. २०१४ नंतर असे अनेक प्रसंग आले,जेव्हा देशाला महत्त्वपूर्ण आणि कठोर निर्णय घेण्याची आवश्यकता होती.

## प्रासंगिक »

### वक्फ की बात है

***सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेली ही मर्यादा अत्यंत योग्य. कारण या विधेयकाचा सर्व भर होता तो फक्त इस्लामवरच.***

'वक्फ'च्या मुद्द्यावर केंद्र सरकार आणि केंद्र सरकारने आणलेल्या कायद्यास विरोध करणारे अशा दोघांचेही दावे अतिशयोक्तीपूर्ण होते. म्हणून सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणी दिलेला अंतिम निकाल हा मध्यममार्गी आणि स्वागतार्ह ठरतो. अलीकडे सगळ्यांनाच या मध्यम मार्गाचा विसर पडलेला दिसतो. त्यामुळे तर या निकालाचे महत्त्व अधिक. केंद्र सरकारने वक्फ कायद्यात आणलेल्या सुधारणांना विरोध करताना संबंधितांनी संसदेच्या अधिकारांचा प्रश्न उपस्थित केला होता. ते अयोग्य होते. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल संसदेचा कायदे करण्याचा अधिकार अबाधित ठेवतो. त्याच वेळी केंद्र सरकार ज्या दोन मुद्द्यांवर वक्फ मंडळांत हस्तक्षेप करू पाहत होते त्या दोन्ही घटनादुरुस्त्या सर्वोच्च न्यायालयाचा हा निकाल फेटाळून लावतो. म्हणजे या प्रकरणातील दोन्हीही बाजूंच्या फाजील मागण्या हा निकाल अव्हेरतो.

आज भारत सर्वच क्षेत्रांत यशाची जी नवनवी शिखरे गाठतो आहे, ते केवळ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कणखर नेतृत्वामुळे आणि त्यांच्यावरील देशवासीयांच्या विश्वासामुळेच शक्य झाले आहे. वैश्विक नेते असलेले मोदीजी वयाची ७५ वर्षे पूर्ण करत असताना त्यांच्या आजवरच्या मौलिक योगदानाविषयी...

# मी पाहिलेले आणि अनुभवलेले मोदीजी...

मला अजूनही आठवते, नरेंद्र मोदी यांची पहिली भेट... मी नागपूरचा महापौर होतो आणि भाजयुमोचा अध्यक्ष होतो. रेशीमबागेत एक अभ्यासवर्ग होता. त्याची जबाबदारी माझ्याकडे होती. तिथे मोदीजी आले, आम्ही त्यांचे स्वागत केले. त्यांनी डॉ. हेडगेवार यांच्या समाधीचे दर्शन घेतले. या अभ्यासवर्गाला अनेक नेते आले होते. त्यापैकी बहुतेक गेस्टहाऊसमध्ये राहायला गेले. स्वाभाविक मी मोदीजींनाही विचारले, आपण येथे राहणार की गेस्टहाऊसमध्ये, पण मोदीजींनी ठाम नकार दिला. रेशीमबागेतच एका खोलीत ते राहिले. एका सामान्य स्वयंसेवकामध्ये जो व्यवहार असतो, तो मला त्यांच्यात पाहायला मिळाला. नरेंद्र मोदी या व्यक्तीबद्दल माझ्या मनात निर्माण झालेले ते पहिले प्रतिबिंब होते. ते आजही तसेच कोरून ठेवलेले आहे. आपले वैश्विक नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी हे वयाची पंचाहत्तर वर्षे पूर्ण करत आहेत, मी त्यांना अतिशय मनापासून शुभेच्छा देतो. भारतमातेच्या सेवेसाठी



आई जगदंबेने त्यांना उदंड आयुष्य द्यावे, उत्तम आरोग्य द्यावे, अशी मी प्रार्थना करतो. २०१४ च्या अनागोंदी, भ्रष्टाचाराच्या दलदलीतून बाहेर निघत आज देश जगातील तिसऱ्या क्रमांकाच्या अर्थव्यवस्थेकडे दमदार वाटचाल करत आहे.

शेजारच्या देशाचे आक्रमण असो की कुण्या देशाने लादलेले आयात शुल्क अशा कोणत्याही संकटाला न डगमगता, ताठ मानेने आणि तितक्याच खंबीरपणे उत्तर देत आहे. कुठल्याही आश्वासक वाटचालीमागे एक नेतृत्व असते. ते देशाला, धोरणांना दिशा देते. या नेतृत्वाचे नाव आहे, नरेंद्र मोदी. राममंदिर असो, अनुच्छेद ३७० रद्द करणे असो, तिहेरी तलाकवर बंदी असो, गरीब कल्याणाचा मोठा कार्यक्रम असो, सर्जिकल स्ट्राइक, एअर स्ट्राइक किंवा अगदी अलीकडचे ऑपरेशन सिंदूर असो, कामगिरीचे वर्णन करायचे तर जागा अपुरी पडेल. महिला, शेतकरी, युवा, वंचित अशा प्रत्येक घटकासाठी त्यांनी शेकडो निर्णय घेतले. त्यांच्या जीवनात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणले. २५ कोटी लोक दारिद्र्यरेषेबाहेर येणे, ही सोपी बाब नाही. या ११ वर्षांत तीन कोटी घरे असोत, १५ कोटी घरांना नळ जोडणी असो, १२ कोटी शौचालयांची निर्मिती असो, ६८ लाख पदपथ विक्रेत्यांना पीएम स्वनिधी असो अशा कितीतरी योजना सांगता येतील. फक्त एक आकडा पुरेसा आहे. ४३.८ लाख कोटी रुपये थेट लाभार्थ्यांच्या खात्यात आले आहेत. गरीब कल्याणासोबतच देश सुधारणांच्या एका नव्या वाटेवर स्वार झाला आहे. विकसित भारताच्या वाटेवरील सर्वांत महत्त्वाचा भागीदार असलेली नारीशक्ती २०२९ मध्ये ३३ टक्के आरक्षणासह संसद आणि राज्य विधानसभांमध्ये दिसणार आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

**संकल्प मेळावा** — फडणवीस यांचा ठाकरे यांच्यावर जोरदार घणाघात

# अच्छा सिला दिया तूने मेरे प्यार का

## माझ्याकडून १०० रुपये घेऊन जा

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय जनता पक्षाचा आज मुंबईत विजय संकल्प मेळावा पार पडला. या मेळाव्यात बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार घणाघात केला. उद्धव ठाकरे यांची मागील दहा भाषणं काढा आणि त्यामध्ये विकासाबद्दलचं एक वाक्य दाखवा आणि माझ्याकडून १०० रुपये घेऊन जा असं म्हणत जोरदार टीका केली. तसेच २०१९ मध्ये घडलेल्या राजकीय घडामोडींचा दाखल देत अच्छा सिला दिया तूने मेरे प्यार का, यार ने ही लूट लिया घर यार का, असं म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरेंवर जोरदार हल्लाबोल केला.**

गेल्यावेळी महापालिकेत आपण थोडक्याने राहिलो होतो. दोन कमी पडले होते. कमी असल्यानंतर काय करायचं? हे आपल्याला माहिती आहे. आपण गणित जमवलं होतं. त्यावेळी भाजपाचा महापौर महापालिकेत बसवण्याची वेळ आली होती. मात्र, आजही आठवतं की मला तेव्हा फोन आला आणि शिवसेनेचा महापौर व्हावा अशी उद्धव ठाकरेंची इच्छा होती असं सांगितलं. त्यानंतर आपण एका क्षणाचाही विलंब लावला नाही."तेव्हा मी सर्व सहकाऱ्यांना बोलावलं आणि विचारलं की काय करायचं? तेव्हा सर्वांनी म्हटलं की ठिक आहे आपण एक पाऊल मागे घेऊ आणि महापौर देऊ. त्यानंतर आम्ही ठरवलं की महापौर, उपमहापौर, स्थायी समिती असं सर्व तुम्ही घ्या. आम्ही महापालिकेत अंकुश म्हणून काम करू. तेव्हा आपण मन मोठं दाखवलं आणि म्हटलं की मित्रासाठी कधी बलिदानही करावं लागतं. पण २०१९ ची विधानसभेची निवडणूक झाली आणि मला गाणं म्हणावं लागलं अच्छा सिला दिया तूने मेरे प्यार का, यार ने ही लूट लिया घर यार का", असं म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी ठाकरेंवर हल्लाबोल केला.



काही उचक्के दररोज सकाळी उठून पंतप्रधान मोदींना प्रश्न विचारतात. मात्र, अशा उचक्क्यांना मुंबईच्या जनतेने २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत उत्तर दिलं आहे.

मुंबई कोणाची? याचं उत्तर सातत्याने २०१४, २०१९, २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत मुंबईकरांनी दिलेलं आहे. मुंबई ही भाजपाची, मुंबई ही महायुतीची आहे हे उत्तर दिलं."आज तुम्ही यांची (उद्धव ठाकरे) भाषणं पाहा. काय बोलतात? यांच्या भाषणांमध्ये, मी तर तुम्हाला १०० रुपये द्यायला तयार आहे. तुम्ही त्यांची (उद्धव ठाकरे) मागची १० भाषणं काढा आणि त्यामध्ये विकासावर एक वाक्य दाखवा. मुंबईकरांच्या जीवनात परिवर्तन आणण्यासाठी विकासाच्या व्हिजनचं एक वाक्य तुम्ही मला दाखवा आणि माझ्याकडून १०० रुपये घेऊन जा. ते विकासावर बोलत नाहीत", अशी टीका देवेंद्र फडणवीस यांनी केली."खरं म्हणजे काही लोक आपलं हसू करून घेतात. साधी बेस्टची निवडणूक होती. आम्ही सांगितलं की कशाला पक्षावर लढायचं? मात्र, काहीजण म्हणाले की आमचा ब्रँड आहे, आमचा ब्रँड आहे. आमच्या शंशाक राव आणि प्रसाद लाड आणि प्रवीण दरेकर यांनी बेस्टच्या निवडणुकीत ब्रँडचा बँड वाजवला", अशी टीका देवेंद्र फडणवीस यांनी ठाकरे बंधूंवर केली.गेल्यावेळी महापालिकेत आपण थोडक्याने राहिलो होतो. दोन कमी पडले होते. कमी असल्यानंतर काय करायचं? हे आपल्याला माहिती आहे. आपण गणित जमवलं होतं. त्यावेळी भाजपाचा महापौर महापालिकेत बसवण्याची वेळ आली होती. मात्र, आजही आठवतं की मला तेव्हा फोन आला आणि शिवसेनेचा महापौर व्हावा अशी उद्धव ठाकरेंची इच्छा होती असं सांगितलं. त्यानंतर आपण एका क्षणाचाही विलंब लावला नाही."तेव्हा मी सर्व सहकाऱ्यांना बोलावलं आणि विचारलं की काय करायचं? तेव्हा सर्वांनी म्हटलं की ठिक आहे आपण एक पाऊल मागे घेऊ आणि महापौर देऊ. त्यानंतर आम्ही ठरवलं की महापौर, उपमहापौर, स्थायी समिती असं सर्व तुम्ही घ्या. आम्ही महापालिकेत अंकुश म्हणून काम करू. तेव्हा आपण मन मोठं दाखवलं आणि म्हटलं की मित्रासाठी कधी बलिदानही करावं लागतं. पण २०१९ ची विधानसभेची निवडणूक झाली आणि मला गाणं म्हणावं लागलं अच्छा सिला दिया तूने मेरे प्यार का, यार ने ही लूट लिया घर यार का", असं म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी ठाकरेंवर हल्लाबोल केला. काही उचक्के दररोज सकाळी उठून पंतप्रधान मोदींना प्रश्न विचारतात. मात्र, अशा उचक्क्यांना मुंबईच्या जनतेने २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत उत्तर दिलं आहे.

### देवेंद्र फडणवीस काय म्हणाले?

मुंबई ही भाजपाची, मुंबई ही महायुतीची आहे हे उत्तर दिलं."आज तुम्ही यांची (उद्धव ठाकरे) भाषणं पाहा. काय बोलतात? यांच्या भाषणांमध्ये, मी तर तुम्हाला १०० रुपये द्यायला तयार आहे. तुम्ही त्यांची (उद्धव ठाकरे) मागची १० भाषणं काढा आणि त्यामध्ये विकासावर एक वाक्य दाखवा. मुंबईकरांच्या जीवनात परिवर्तन आणण्यासाठी विकासाच्या व्हिजनचं एक वाक्य तुम्ही मला दाखवा आणि माझ्याकडून १०० रुपये घेऊन जा. ते विकासावर बोलत नाहीत.

# कृष्णा बँकेचा ‘सर्वोत्कृष्ट बँक’ पुरस्काराने गौरव!

## दि महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स फेडरेशनतर्फे नाशिक येथे पुरस्कार प्रदान

।सातारा।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**कृष्णाकाठच्या ग्रामीण भागाची अर्थवाहिनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कृष्णा सहकारी बँकेला नाशिक येथे नुकत्याच झालेल्या दि महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स फेडरेशनच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सर्वोत्कृष्ट बँकेचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. विमाजी विरोधी पक्षनेते आ. दरेकर यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते कृष्णा बँकेच्या संचालकांनी व हा पुरस्कार स्वीकारला.**




कृष्णा बँकेने चेअरमन आ. डॉ. अतुलबाबा भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली मोठा विस्तार केला असून, सामान्य माणसांसाठी कार्य आणि सभासद हिताचा कारभार या उद्दिष्टाने बँकेने वाटचाल सुरु ठेवली आहे. सहकार क्षेत्राला बळकटी आणणाऱ्या अशा सहकारी बँकांच्या कार्याला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने, दि महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स फेडरेशनच्यावतीने दरवर्षी सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या बँकांना पुरस्काराने गौरविण्यात येते. यंदा या संस्थेने राज्यातील ५०० ते १००० कोटी रूपयांपर्यंतच्या ठेवी असणाऱ्या नागरी सहकारी बँकांची पाहणी करून, या विभागात सर्वोत्कृष्ट कामगिरी नोंदविणारी बँक म्हणून कृष्णा सहकारी बँकेची प्रथम क्रमांकाच्या पुरस्कारासाठी निवड केली होती.

### मान्यवरांची उपस्थिती...

नाशिक येथे आयोजित दि महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स फेडरेशनच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत आ. प्रवीण दरेकर, नॅशनल अम्ब्रेला ऑर्गनायझेशन ऑफ को-ऑपरेटिव्ह बँक्सचे अध्यक्ष ज्योतिंद्रभाई मेहता व फेडरेशनचे अध्यक्ष अजय ब्रह्मेचा यांच्या हस्ते कृष्णा बँकेच्या संचालकांनी व अधिकाऱ्यांनी हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी बँकेचे ज्येष्ठ संचालक शिवाजीराव थोरात, हर्षवर्धन मोहिते, प्रमोद पाटील, शिवाजी पाटील, व्यवस्थापन मंडळाचे सदस्य प्रदीप पाटील, दिलीपराव पाटील, हेमंत पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी भगवान जाधव, व्यवस्थापक गणपती वाटेगावकर उपस्थित होते. या पुरस्काराबद्दल बँकेचे पदाधिकारी, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

## पाकिस्तानची मोठी कबुली

## भारत-पाकिस्तानमधील शस्त्रसंधी कशी झाली?

# अमेरिकेने मध्यस्थी केली होती का?

## ट्रम्प यांच्या दाव्याची काढली हवा

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**जम्मू-काश्मीरमधील पहलगाम परिसरात २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पाकिस्तानला चांगलाच धडा शिकवला. त्यानंतर भारत-पाकिस्तानमध्ये शस्त्रसंधी झाली आणि दोन्ही देशातील तणाव कमी झाला. मात्र, भारत-पाकिस्तानमधील शस्त्रसंधीसाठी आपण मध्यस्थी केल्याचा दावा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अनेकदा केला. पण डोनाल्ड ट्रम्प यांचा हा मध्यस्थीचा दावा भारताने फेटाळून लावला.**



दरम्यान, आता भारत-पाकिस्तानमध्ये झालेल्या शस्त्रसंधीबाबत पाकिस्तानने मोठी कबुली दिली असून भारत-पाकिस्तानमधील शस्त्रसंधी नेमकं कशी झाली? अमेरिकेने खरंच मध्यस्थी केली होती का? याचा खुलासा पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री आणि उपपंतप्रधान इशाक दार यांनी केला आहे. ‘अमेरिकेच्या मध्यस्थीचा प्रस्ताव भारताने नाकारला होता’, असं इशाक दार यांनी म्हटलं आहे. त्यामुळे इशाक दार यांनी ट्रम्प यांच्या मध्यस्थीच्या दाव्याची हवाच काढली आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.भारताने दोन्ही देशांमधील मुद्द्यांवर कोणत्याही तिसऱ्या पक्षाच्या मध्यस्थीला सहमती दर्शवली नाही. जेव्हा पाकिस्तानने अमेरिकेचे मंत्री मार्को रुबियो यांच्यासमोर भारताबरोबर मध्यस्थीची भूमिका मांडली, तेव्हा मार्को रुबियो यांनीही म्हटलं होतं की भारताने नेहमीच पाकिस्तानबरोबरचे मुद्दे द्विपक्षीय असल्याची भूमिका मांडली आहे”, असं इशाक दार यांनी एका म्हटलं आहे.ऑपरेशन सिंदूरनंतर अमेरिकेने युद्धबंदीचा प्रस्ताव दिला होता. ज्यामध्ये भारत आणि पाकिस्तानमधील चर्चा तटस्थ ठिकाणी होईल असं म्हटलं होतं. मात्र, त्यानंतर रुबियो यांच्यासोबत झालेल्या बैठकीत आम्हाला सांगण्यात आलं की भारताने या प्रस्तावाला सहमती दर्शविली नाही”, असं इशाक दार यांनी म्हटलं आहे.इशाक दार पुढे म्हणाले की, “आम्हाला तिसऱ्या पक्षाच्या सहभागाबाबत काही हरकत नाही. मात्र, भारत स्पष्टपणे भूमिका मांडतो की ही द्विपक्षीय बाब आहे. आम्हाला द्विपक्षीय बाबीला देखील हरकत नाही. पण संवाद व्यापक असले पाहिजेत. दहशतवाद, व्यापार, अर्थव्यवस्था, जम्मू आणि काश्मीर असे सर्व विषय असेल पाहिजेत. आम्ही कोणत्याही गोष्टीची भीक मागत नाही.

आम्ही एक शांतताप्रिय देश आहोत आणि आमचा विश्वास आहे की संवाद हा पुढे जाण्याचा मार्ग आहे. मात्र, त्यासाठी दोघांनाही वेळ द्यावा लागेल.”भारत आणि

### इशाक दार नेमकं काय म्हणाले?

‘अमेरिकेच्या मध्यस्थीचा प्रस्ताव भारताने नाकारला होता’, असं इशाक दार यांनी म्हटलं आहे. त्यामुळे इशाक दार यांनी ट्रम्प यांच्या मध्यस्थीच्या दाव्याची हवाच काढली आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.भारताने दोन्ही देशांमधील मुद्द्यांवर कोणत्याही तिसऱ्या पक्षाच्या मध्यस्थीला सहमती दर्शवली नाही. जेव्हा पाकिस्तानने अमेरिकेचे मंत्री मार्को रुबियो यांच्यासमोर भारताबरोबर मध्यस्थीची भूमिका मांडली.

पाकिस्तानदरम्यान मे महिन्यात झालेल्या लष्करी संघर्षादरम्यान दोन्ही देशांनी एकमेकांची मिळून पाच लढाऊ विमाने पाडली होती, असा दावा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अनेक वेळा केला होता. तसेच दोन्ही देश अणुयुद्धाच्या उंबरठ्यावर होते. मात्र, मी ते युद्ध थांबवलं” असंही डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं होतं. डोनाल्ड ट्रम्प यांनी आतापर्यंत ३० हून अधिक वेळा भारत-पाकिस्तान युद्ध रोखल्याचं श्रेय घेण्याचा प्रयत्न केला आहे. हे श्रेय घेत असताना त्यांनी आतापर्यंत वेगवेगळे दावे गेले आहेत. बऱ्याचदा त्यांच्या दोन दाव्यांमध्ये तफावत आढळली आहे.ट्रम्प यांनी सातत्याने दावा केला की भारत-पाकिस्तान युद्ध रोखलं. मात्र, भारताने प्रत्येक वेळी ट्रम्प यांचा दावा फेटाळून लावला आहे. भारताने म्हटलं आहे की दोन्ही देशांच्या वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष बातचीत करून युद्धविरामाचा निर्णय घेतला. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेत स्पष्ट केलं होतं की भारत-पाकिस्तान संघर्ष रोखण्यात कुठल्याही तिसऱ्या देशाचा सहभाग नव्हता. तो दोन देशांनी घेतलेला निर्णय होता.दरम्यान, आता भारत-पाकिस्तानमध्ये झालेल्या शस्त्रसंधीबाबत पाकिस्तानने मोठी कबुली दिली असून भारत-पाकिस्तानमधील शस्त्रसंधी नेमकं कशी झाली? अमेरिकेने खरंच मध्यस्थी केली होती का? याचा खुलासा पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री आणि उपपंतप्रधान इशाक दार यांनी केला आहे.

# महिला अधिकाऱ्याच्या घरी छापा

## कोट्यवधींची रोकड आणि सोने जप्त; जमिनी मुस्लीमांना विकून नफा

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आसामचे मुख्यमंत्री हिंमता बिस्वा सरमा यांच्या विशेष दक्षता विभागाने आसाम सिव्हिल सर्विसेसच्या २०१९ च्या बॅचच्या अधिकारी नुपूर बोरा यांच्या घरावर छापा टाकला असता त्यांच्या घरातून ९२ लाखांची रोकड आणि सोन्याचे दागिने आढळून आले आहेत.**



तसेच त्यांच्या दुसऱ्या घरातून १० लाखांची अतिरिक्त रोकड आढळून आली आहे. एकूण सर्व मुद्देमाल दोन कोटींहून अधिकचा असल्याचे सांगितले जात आहे. नुपूर बोरा या हिंदूंच्या जमिनी मुस्लिमांना हस्तांतरित करत असल्याचा संशय असल्यामुळे गेल्या काही काळापासून त्यांच्यावर पाळत ठेवण्यात आली होती, असे मुख्यमंत्री हिंमता बिस्वा सरमा यांनी सांगितले. सोमवारी मुख्यमंत्री दक्षता कक्षाने महिला अधिकारी नुपूर बोरा यांच्याशी संबंधित कथित चार ठिकाणी एकाच वेळी छापे टाकले. गुवाहाटी येथे असलेले त्यांचे निवासस्थान आणि बारपेटा येथील भाड्याच्या घऱ्याचा

### मोठा भ्रष्टाचार झालेला आहे

नुपूर बोरा यांनी केलेल्या जमीन हस्तांतर प्रकरणांवर सरकारची नजर होती. मुस्लीम बहुल जिल्ह्यांत गेल्या काही काळापासून मोठा भ्रष्टाचार झालेला आहे. गेल्या सहा महिन्यांपासून आम्ही या अधिकाऱ्याच्या हालचालींवर लक्ष ठेवून होतो. बारपेटा जिल्ह्यात नियुक्ती मिळाली असताना तिने (बोरा) पैशांच्या मोबदल्यात हिंदूंच्या जमिनी मुस्लिमांच्या नावे केल्या.

यात समावेश आहे.नुपूर बोरा (३६) या मुळच्या आसामच्या गोलाघाट जिल्ह्यातील आहेत. २०१९ साली आसाम नागरी सेवेत निवड झाल्यानंतर त्यांची पहिली पोस्टिंग कार्बी आंगलोंग जिल्ह्यात सहायक आयुक्त म्हणून करण्यात आली. जून २०२३ मध्ये त्यांची बदली होऊन बारपेटा जिल्ह्यात प्रांत अधिकारी म्हणून करण्यात आली. सध्या त्या कामरूप जिल्ह्यातील गोरोईमारी येथे प्रांत अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.या कारवाईनंतर मुख्यमंत्री हिंमता बिस्वा सरमा यांनी सांगितले.

# ‘गोलमाल 5’ चित्रपटाच्या प्रदर्शनाबद्दल रोहित शेट्टीचे मोठे विधान

बॉलीवूडमध्ये काही चित्रपट असे आहेत, ज्यांचा वेगळा चाहता वर्ग आहे. त्यापैकी ‘गोलमाल’ हा चित्रपट आहे. या चित्रपटाचे चार भाग आतापर्यंत आले आहेत आणि गोलमाल सीरिजच्या चारही भागांनी प्रेक्षकांचे भरभरून मनोरंजन केले आहे. आता ‘गोलमाल ५’ हा चित्रपट कधी येणार, याची प्रेक्षकांना उत्सुकता लागलेली आहे. आता चित्रपटाचा दिग्दर्शक रोहित शेट्टीने यावर मोठे वक्तव्य केले आहे.रोहित शेट्टीने नुकतीच ‘पिंकविला’ला मुलाखत दिली. या मुलाखतीमध्ये रोहित शेट्टीने ‘गोलमाल ५’ या चित्रपटाबद्दल वक्तव्य केले आहे. तो म्हणाला, “गोलमाल सीरिज कायम बनत राहील. चित्रपट बनणार नाही, असे होणार नाही. या चित्रपटावर काम सुरू आहे. मात्र, त्यासाठी अजून वेळ लागेल.” याआधी दिलेल्या एका मुलाखतीत त्याने म्हटले होते की,






येत्या दोन वर्षांत तुम्हाला ‘गोलमाल ५’ चित्रपट पाहायला मिळेल. हा चित्रपट आधीच्या चित्रपटांपेक्षा वेगळा असेल. हा कॉमेडी चित्रपट असून तो मी ॲक्शन चित्रपटांसारखा बनवू शकत नाही. या चित्रपटाचा खास चाहतावर्ग असून त्यांच्यासाठी ही सीरिज कायम सुरू राहणार, असं तो म्हणाला होता.२००६ साली ‘गोलमाल फन अनलिमिटेड’ हा चित्रपट आला होता.

## ती मला तिचा आधारस्तंभ मानते

बॉलीवूड अभिनेत्री सोनाक्षी सिन्हा गेल्या काही दिवसांपासून तिच्या विवाहामुळे मोठ्या चर्चेत आहे. तिने झहीर इक्बालबरोबर लग्नगाठ बांधली असून तिने लग्न करणार असल्याचे जाहीर केल्यापासून ती मोठ्या चर्चेत होती. आंतरधर्मीय लग्न करत असल्यामुळे तिच्यावर मोठी टीका करण्यात आली होती. याबरोबरच सोनाक्षी आणि संपूर्ण सिन्हा कुटुंबाविरुद्ध मोर्चेदेखील काढल्याचे पाहायला मिळाले होते.सोनाक्षी आणि झहीरने नुकतीच ‘गल्लाटा इंडिया’ला मुलाखत दिली. या मुलाखतीदरम्यान या जोडप्याने शत्रुघ्न सिन्हा यांचा एक व्हिडीओ दाखवला आहे. या व्हिडीओमध्ये शत्रुघ्न सिन्हांनी आपल्या मुलीच्या लग्नाबद्दल भावना व्यक्त केल्या आहेत. त्यांनी म्हटले आहे की, सोनाक्षी आणि झहीर हे एकमेकांसाठी बनलेले आहेत. लोकांनी काहीही म्हणण्याचा प्रयत्न केला, मात्र आमच्यासाठी आमच्या मुलांचा आनंद सर्वोच्च आहे. विशेष म्हणजे आमच्या मुलीचा आनंद आमच्यासाठी महत्त्वाचा आहे. आम्हाला वाटतं की, ती आनंदी आहे आणि कायम आनंदी राहील. तिने काहीच असंवैधानिक किंवा कायद्याच्या विरुद्ध केलेले नाही. पालक आपल्या मुलांसाठी खूप काही करतात आणि मुलीसोबत खंबीरपणे उभे राहणे हा छोटा वाटा आहे. तिच्या निर्णयांमध्ये आणि आनंदामध्ये मी कायमच तिच्या पाठीशी खंबीरपणे उभा असेन, असे सोनाक्षीने दाखवलेल्या व्हिडीओ क्लीपमध्ये त्यांनी म्हटले आहे.

## सायकलने शाळेत जायची परिणिती



परिणिती चोप्रा सध्या तिच्या लग्नामुळे चर्चेत आहे. यादरम्यान, तिच्याशी संबंधित एक व्हिडिओ चर्चेत आहे, त्यात तिने सांगितले की, जेव्हा ती लहान होती तेव्हा त्यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती चांगली नव्हती. व्हिडीओमध्ये एका मुलीच्या फेसबुक पोस्टचे स्क्रीनशॉट देखील आहेत, त्यात तिने परिणितीच्या म्हणण्याला पूर्णपणे नकार दिला आहे. परिणितीने सांगितलेल्या सर्व गोष्टी खोट्या असल्याचे ती म्हणाली. आजच्या प्रमाणे त्या काळातही परिणितीची कौटुंबिक पार्श्वभूमी खूप मजबूत होती, असे तिने म्हटले आहे. व्हिडीओ समोर येताच यूजर्स त्याला जोरदार ट्रोल करत आहेत. लोक म्हणतात की परिणीतीने सहानुभूतीसाठी खोट्या गोष्टी सांगितल्या. कियारा-सिद्धार्थसारखे जयमालाचे फंक्शन केल्यामुळे लोक तिला प्रचंड ट्रोल करत आहेत. हा व्हिडिओ 2017 च्या मार्शल आर्ट इव्हेंटमधील आहे. या कार्यक्रमात दिलेल्या मुलाखतीत परिणिती म्हणाली होती की, वाढत्या वयाबरोबर मी आणि माझे भाऊ दोघांनीही अनेक आव्हानांचा सामना केला आहे. त्यावेळी आमच्याकडे जास्त पैसे नव्हते. यासाठी मी सायकलने शाळेत जायचे. बस किंवा कारने जाणेही शक्य नव्हते. त्यावेळी आमच्याकडे गाडीही नव्हती. व्हिडिओमध्ये एका मुलीच्या फेसबूक पोस्टचे स्क्रीनशॉटही आहेत. त्या मुलीने स्वतःला परिणीतीची मैत्रीण असल्याचे सांगितले आहे. अशा खोट्या गोष्टी सांगताना लाज वाटली पाहिजे, असे त्यांनी लिहिले आहे. उच्च समाजातून आलेली असूनही ती कॅमेऱ्यासमोर पडून होती. मला वाटते की प्रत्येक सेलिब्रिटी असेच करतो. सहानुभूतीसाठी तो म्हणाला की त्याच्याकडे गाडी नाही आणि पैसे नाहीत. आम्ही दोघे एकाच शाळेत शिकलो. मला आठवते तिच्या वडिलांकडे गाडी होती. त्याकाळी सायकल चालवण्याचा ट्रेंड असल्यामुळे ती कारऐवजी सायकलने शाळेत यायची. त्यावेळी अनेकांकडे सायकलीही नव्हत्या हेही लक्षात घेण्यासारखे आहे. परिणितीचा हा व्हिडिओ REDDIT साइटवर उपलब्ध आहे. या व्हिडिओवर कमेंट करताना एका चाहत्याने लिहिले होते की, परिणिती नेहमीच थ्रो करत असते. त्यांच्याबद्दल काहीही योग्य नाही. मी भेदभाव करत आहे, असे वाटू शकते परंतु ते खरे आहे की त्यांनी कियारा आणि सिडच्या लग्नाची एन्ट्री देखील कॉपी केली आहे. 17 व्या वर्षी शिक्षणासाठी यूकेला गेल्यावर ती गरीब कशी असेल? दुसऱ्या यूझरने उपरोधिकपणे लिहिले की, बिचारी परिणीती सायकलवरून शाळेत गेल्यानंतर शॉकमध्ये आहे.

## अभिषेकच्या कारचे ऐश्वर्या रायशी कनेक्शन

मुंबईत सध्या पावसाची संततधार आहे. याच पावसात अभिषेक बच्चन (ABHISHEK BACHCHAN) फिरायला बाहेर पडला, पण त्याच्याबरोबर पत्नी ऐश्वर्या राय बच्चन व मुलगी आराध्या नव्हते तर तो भाचा अगस्त्य नंदाबरोबर बाहेर पडला होता. अभिषेक व अगस्त्यबरोबर किंग खानची लाडकी लेक सुहानादेखील होती. बऱ्याच काळापासून सुहाना व अगस्त्य एकमेकांना डेट करत असल्याचं म्हटलं जात आहे, अशातच आता त्यांचा हा फोटो चर्चेत आहे. मंगळवारी रात्री अभिषेक बच्चन त्याच्या नवीन काळ्या कारमध्ये पापाराझींच्या कॅमेऱ्यात कैद झाला. यावेळी त्याच्याबरोबर बहीण श्वेता बच्चनचा मुलगा अगस्त्य नंदा, मुलगी नव्या नवेली नंदा आणि शाहरुख खानची मुलगी सुहाना खानही होते. अगस्त्य आणि सुहाना डेट करत असल्याच्या अफवा आहेत. या व्हिडीओने नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. योगेन शाह नावाच्या अकाउंटवरून फोटो शेअर करण्यात आले आहेत.सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या फोटोंमध्ये अभिषेक बच्चन एका मोठ्या काळ्या कारमध्ये ड्रायव्हर सीटवर बसलेला दिसतो. तर त्याच्या शेजारच्या सीटवर त्याचा भाचा अगस्त्य नंदा बसला आहे.

## जान्हवी कपूरचा आजारपणाबाबत मोठा खुलासा



बॉलीवूडचे कलाकार हे नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असतात. कधी त्यांच्या चित्रपटांच्या निमित्ताने, कधी सोशल मीडियावरील पोस्टमुळे, तर कधी त्यांच्या वक्तव्यामुळे हे कलाकार चर्चांचा भाग बनतात. बॉलीवूड अभिनेत्री जान्हवी कपूर सध्या आजारपणाबाबत केलेल्या वक्तव्यामुळे मोठ्या चर्चेत आहे.‘टाइम्स नाऊ’ला दिलेल्या मुलाखतीत जान्हवीने आपल्या आजारपणाबद्दल खुलासा केला आहे. या मुलाखतीत तिने सांगितले की, मी इतकी आजारी पडले होते की, मला दवाखान्यात ॲडमिट करावं लागलं. माझी प्रतिकारशक्ती खूप कमी झाली होती. ‘मिस ॲण्ड मिसेस माही’ या चित्रपटाचे प्रमोशन सुरू होण्याआधीपासूनच ती सतत काम करत होती. यादरम्यान, मी सतत प्रवासदेखील करत होते, शूटिंग सुरू होते. या संपूर्ण महिन्यात मी खूप थकून गेले होते. ती पुढे म्हणते की, मी एका कार्यक्रमासाठी चेन्नईला गेले होते. तिथून परतल्यावर मला अस्वस्थ वाटत होते. त्यामुळे मी घरीच राहण्याचा निर्णय घेतला आणि कामाचे वेळापत्रक बदलले. मात्र, गुरुवारी प्रकृती खालावली. सुरुवातीला असे वाटत होते, काहीतरी भेसळयुक्त पदार्थ खाल्ला गेला असावा आणि त्यामुळे मला आजारी पडल्यासारखे वाटत आहे. पण, जेव्हा रक्ताची चाचणी केली तेव्हा तर ते वेगळीच बाब समोर आली होती. तिची पचनशक्ती चांगली झाली; मात्र तिला तीव्र अंगदुखी, अशक्तपणाचा सामना करावा लागला. मला माझ्या रोजच्या गोष्टी करण्यात अडचणी येत होत्या, त्यासाठी मला कोणाची तरी मदत घ्यावी लागत होती. त्यामुळे अपंगत्व आल्यासारखे वाटत होते.

बहिष्काराचा मुद्दा चर्चेत

हस्तांदोलन करणं नियमाचा भाग आहे का?

# स्पर्धेत बहिष्कार टाकता येतो का?

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आशिया चषकात भारत-पाकिस्तान लढतीच्या निमित्ताने बहिष्काराचा मुद्दा चर्चेत आला आहे. एप्रिल महिन्यात जम्मू काश्मीर मधल्या पहलगाम इथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ नागरिकांनी प्राण गमावले होते. भारतीय लष्कराने ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तानातील दहशतवादी तळ उद्धस्त करत प्रत्युत्तर दिलं.**

## आयसीसीचे नियम काय सांगतात?




पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातले संबंध दुरावले. आशिया चषकात हे दोन संघ एकमेकांविरुद्ध खेळणार का? याविषयी साशंकता होती. केंद्र सरकारने यासंदर्भात भूमिका जाहीर केली. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद तसंच आशियाई क्रिकेट परिषदेतर्फे आयोजित सामन्यांमध्ये भारतीय संघ पाकिस्तानविरुद्ध खेळेल. मात्र द्विराष्ट्रीय मालिका होणार नाही. सोप्या भाषेत भारतीय संघ पाकिस्तानात मालिकेसाठी जाणार नाही. याच धर्तीवर पाकिस्तानचा संघ भारतात येणार नाही. केंद्र सरकारने हे धोरण स्पष्ट केल्यामुळे भारतीय संघ आशिया चषकात पाकिस्तानविरुद्ध खेळणार हे स्पष्ट झालं. पहलगाम हल्ल्याला अवघे काही महिने झाले आहेत. या घटनेची दाहकता अनुभवलेल्या असंख्य चाहत्यांनी भारत-पाकिस्तान सामना पाहणार नाही अशी भूमिका घेतली. भारताने पाकिस्तानशी खेळू नये अशी भूमिका अनेक माजी खेळाडूंनी मांडली. या सगळ्या पार्श्वभूमीवर रविवारी भारत-पाकिस्तान सामना खेळवण्यात आला. नाणेफेकीवेळी भारताचा कर्णधार सूर्यकुमार यादव आणि पाकिस्तानचा कर्णधार सलमान अली अघा यांनी हस्तांदोलन केलं नाही. सर्वसाधारण शिरस्त्याप्रमाणे नाणेफेकीवेळी दोन्ही कर्णधार हस्तांदोलन करतात. भारतीय संघाने हा सामना जिंकला. सामना जिंकल्यानंतर दोन्ही संघ एकमेकांशी हस्तांदोलन करतात. भारतीय संघाने हस्तांदोलन टाळलं. या प्रकारामुळे नाराज होऊन पाकिस्तानचा कर्णधार सलमान अली अघा पुरस्कार वितरण सोहळ्याला उपस्थित राहिला नाही. त्यानंतर पत्रकार परिषदेत प्रशिक्षक माईक हेसन यांनीही हस्तांदोलन न करण्याची भूमिका पटली नसल्याचं सांगितलं. पाकिस्तानचा संघ सामना संपल्यानंतर खेळभावनेचा भाग म्हणून हस्तांदोलनासाठी तयार होता मात्र भारतीय खेळाडूंनी पाठ फिरवत ड्रेसिंगरुममध्ये जाणं पसंत केलं असं हेसन म्हणाले.हस्तांदोलन न करण्याचा मुद्दा पेटला. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष मोहसीन नक्वी यांनी याप्रकरणी सामनाधिकारी अँडी पायक्रॉफ्ट यांना लक्ष्य केलं. पायक्रॉफ्ट यांनीच कर्णधारांना हस्तांदोलन न करण्याची सूचना केली होती असा आरोप नक्वी यांनी केला. पायक्रॉफ्ट यांची तातडीने हकालपट्टी करण्यात यावी अशी मागणी त्यांनी आयसीसीकडे केली. मागण्या पूर्ण न झाल्यास पाकिस्तान युएईविरुद्धच्या लढतीवर बहिष्कार घालण्याचे संकेत दिले.आशिया चषक स्पर्धा ही दर दोन वर्षांनी होते. आशियाई क्रिकेट परिषदेतर्फे या स्पर्धेचं आयोजन केलं जातं. आशियाई उपखंडातील देशांमध्ये सौहार्द वाढीस लागावं यासाठी १९८५ मध्ये आशियाई क्रिकेट परिषदेची स्थापना करण्यात आली. आगामी काळात कोणत्या प्रकाराचा वर्ल्डकप होणार आहे त्यानुसार स्पर्धेचा फॉरमॅट ठरतो. यंदाचा आशिया चषक टी२० प्रकारात होत आहे. यंदा या स्पर्धेत भारतासह पाकिस्तान, श्रीलंका, बांगलादेश, अफगाणिस्तान, ओमान, युएई, हाँगकाँग हे संघ सहभागी होत आहेत. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे चेअरमन मोहसीन नक्वी हे आशियाई क्रिकेट परिषदेचे अध्यक्ष आहेत. त्यांनी भारताचे जय शाह यांच्याकडून पदभार स्वीकारला. जय शाह यांनी आयसीसीच्या प्रमुखपदाची धुरा हाती घेतल्याने आशियाई क्रिकेट परिषदेचं अध्यक्षपद पाकिस्तानला मिळालं. स्पर्धेचं आयोजन आशियाई क्रिकेट परिषदेतर्फे होत असलं तरी सामन्यांसाठी नियम आयसीसीचेच लागू आहेत. आयसीसीसाठी नियम तयार करण्याचं काम मेरलीबोन क्रिकेट क्लब ही संस्था करते.

### आशियासाठी नियम कोणाचे?

ही नियमावली सर्व आंतरराष्ट्रीय सामन्यांना लागू होते. बाकी आंतरराष्ट्रीय सामन्यांप्रमाणे या स्पर्धेकरता सामनाधिकारी आणि पंचांच्या नियुक्तीचं कामही आयसीसीच करतं.बहिष्कार टाकता येतो मात्र त्याच्या परिणामांचाही सामना करावा लागतो. खेळांव्यतिरिक्त अन्य कारणासाठी सामन्यावर बहिष्कार टाकल्यास सामना FOREFEIT करण्यात येतो.

# इंडियाच्या जर्सीवर APOLLO TYRES चा लोगो

## BCCI ला प्रत्येक सामन्यासाठी किती पैसे मिळणार?

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय संघ आशिया चषक २०२५ स्पर्धेत जर्सी स्पॉन्सरशिवाय मैदानात उतरला आहे. आतापर्यंत भारतीय संघाच्या जर्सीवर ड्रीम इलेव्हन झळकत होतं. पण भारत सरकारने ऑनलाईन गेमिंगवर बंदी घातल्यानंतर ड्रीम इलेव्हेनला बीसीसीआयसोबत असलेला करार रद्द करावा लागला.**




दरम्यान मंगळवारी बीसीसीआयने नव्या जर्सी स्पॉन्सरशिपची घोषणा केली आहे. बीसीसीआयने अपोलो टायर्ससोबत अडीच वर्षांचा करार केला आहे. हा करार २०२८ पर्यंत कायम राहणार आहे.इथून पुढे भारतीय पुरूष आणि महिला संघाच्या तिन्ही फॉरमॅटमधील जर्सीवर अपोलो टायर्सचा लोगो झळकणार आहे. आशिया चषक २०२५ स्पर्धेत भारतीय संघ जर्सी स्पॉन्सरशिवाय मैदानात उतरला आहे. यासह भारतीय महिला संघ ऑस्ट्रेलियाच्या महिला संघाविरुद्ध सुरू असलेल्या वनडे मालिकेत देखील जर्सी स्पॉन्सरशिवाय खेळत आहे.पीटीआयने दिलेल्या माहितीनुसार,बीसीसीआय आणि अपोलो टायर्स यांच्यात ५७९ कोटींचा करार झाला आहे. बीसीसीआयला एका सामन्यासाठी अपोलो टायर्सकडून ४.५ कोटी रूपये मिळणार आहेत. याआधी ड्रीम इलेव्हेनसोबत बीसीसीआयने ३५८ कोटींचा करार केला होता. आशिया चषक स्पर्धेनंतर भारतीय संघाला महत्वाच्या मालिका खेळायच्या आहेत. येत्या ३० सप्टेंबरपासून आयसीसी महिला वनडे वर्ल्डकप स्पर्धा सुरू होणार आहे. या स्पर्धेत भारतीय महिला संघ अपोलो टायर्सचा लोगो असलेली जर्सी घालून मैदानात उतरणार की नाही.

### आशियात दमदार कामगिरी

दुबईत आशिया चषक २०२५ स्पर्धेला सुरूवात झाली आहे. या स्पर्धेतील पहिल्या सामन्यात भारतीय संघाने यूएईचा एकतर्फी पराभव केला. भारतीय संघाचा स्पर्धेतील दुसरा सामना रविवारी पाकिस्तानविरुद्ध पार पडला. या सामन्यातही भारतीय संघाने एकतर्फी विजयाची नोंद केली. या सामन्यात पाकिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

| बुधवार |

| दि. 17 सप्टेंबर 2025|

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# आजी-माजी पाच आमदारांचा भोसरी गावठाण राजकीय 'केंद्रबिंदू'!

## ग्राउंड रिपोर्ट: लांडे-लांडगे-गव्हाणे-फुगे-शिंदे यांच्यात होणार सामना

| पिंपरी चिंचवड | अविनाश आदक : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025 ची प्रारुप प्रभाग रचना जाहीर झाली. ऑक्टोबरमध्ये हरकती आणि सूचनांची सुनावणी होईल आणि सदरची प्रभाग रचना अंतिम केली जाणार आहे. त्यानंतर आरक्षण सोडत आणि निवडणूक आचारसंहिता सुरू होईल. ही निवडणूक महायुती आणि महाविकास आघाडीतील घटकपक्ष स्वबळावर लढवतील, असे चित्र आहे. डिसेंबरमध्ये मतदान आणि जानेवारी-2026 मध्ये महानगरपालिकेत नवीन महापौर विराजमान होतील. या निमित्ताने "महाईन्यूज" च्या माध्यमातून प्रभागनिहाय राजकीय स्थितीबाबत विश्लेषण पहिला "ग्राउंड रिपोर्ट" प्रसिद्ध करीत आहोत.**





गेल्या पंचवार्षिकमध्ये आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याची संधी मिळाली. स्थायी समितीचे अध्यक्षपदी काम करताना आंतरराष्ट्रीय कुस्ती संकुल, कबड्डी संकुल उभारण्यात आले. फुटबॉल, हांकी मैदान विकसित झाले. 'फिर अॅक्वॅरिअम'चे काम प्रगतीपथावर आहे. स्ट्रॉम वॉटर लाईन सक्षम केले आहेत. त्यामुळे पावसाळी पाणी साचण्याची समस्या सुटली आहे. रस्ते विकास, शाळा इमारत अशी कामे मार्गी लागली आहेत. आण्णाभाऊ साठे सांस्कृतिक हॉल झाला आहे. भोसरीचे प्रवेशद्वारचे काम पूर्ण झाले. विकासकामांच्या जोरावर भाजपाचे चारही नगरसेवक निवडून येतील.

**–संतोष लोंढे,** माजी नगरसेवक.




उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्त्वाखाली प्रभागाचाच नव्हे, तर संपूर्ण शहराचा विकास झाला आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांची शिवसृष्टी, भोसरी गावचे प्रवेशद्वार अशी महत्त्वाची कामे झाली. प्रशासकीय काळात आणि भाजपा सत्ताकाळात विकासकामांचा बोजवारा उडाला आहे. प्रलंबित गार्डन आणि डीपी रस्त्यांची कामे झालेली नाहीत. गेल्या १५-२० वर्षांत दिग्गज प्रतिनिधीत्व करीत आहेत. पण, अद्याप कॉंक्रिटीकरणाचे काम १०० टक्के पूर्ण करु शकले नाही. ड्रनेज लाईनचे मेंटनन्स झाले नाही. मुलभूत सुविधांसाठी अद्यापही प्रतीक्षा करावी लागत आहे. अन्य गावांची ग्रामदैवत मंदिर आणि परिसर विकसित झाला, पण आमच्याकडे तसे दिसत नाही.

.**–विराज लांडे,** इच्छुक, राष्ट्रवादी.

2017 च्या निवडणुकीप्रमाणे प्रभाग "रचना जैसे थे" आहे. प्रभाग क्रमांक 7 मध्ये कोणताही बदल नाही. ज्याअर्थी 2017 प्रमाणे प्रभाग निश्चित झाले आहेत. त्यासाठी 2011 ची जनगनना ग्रहीत धरण्यात आली आहे. तत्कालीन जनगननेनुसार, प्रभागाची लोकसंख्या 53 हजार 67 इतकी दर्शवण्यात आली आहे. त्यापैकी 4 हजार 683 इतकी अनुसूचित जाती आणि 828 इतकी अनुसूचित जमातीची लोकसंख्या आहे.

लोकसंख्येच्या प्रमाणानुसार, 2017 मध्ये शहरात भाजपाची मोठी लाट होती. या प्रभागातून भाजपाचे चारही नगरसेवक निवडून आले होते. प्रभागातील अ- गटातून भाजपाचे संतोष लोंढे यांनी 10 हजार 974 मते मिळवत, राष्ट्रवादीच्या संतोष लांडगे यांचा पराभव केला होता. सध्या संतोष लांडगे आमदार महेश लांडगे यांच्यासोबत आहेत. ब- गटातून भाजपाच्या तिकिटावर लढलेल्या प्रा. सोनाली गव्हाणे यांनी 11 हजार




906 मते मिळवली होती. त्यांनी राष्ट्रवादीच्या सोनम गव्हाणे यांचा पराभव केला होता.

विद्यमान आमदार महेश लांडगे यांच्या त्यावेळी समर्थक असलेल्या भिमाबाई फुगे यांनी क- गटातून महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर 2022 मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यानंतर विधानसभा निवडणूक 2024 मध्ये राष्ट्रवादी शरद पवार गटात आणि त्यानंतर आता त्या राष्ट्रवादी अजित पवार गटात आहेत.

शहराचे ज्येष्ठ नेते आणि माजी आमदार ज्ञानेश्वर लांडगे यांचा मुलगा अॅड. नितीन लांडगे यांनी ड- गटातून या प्रभागात निवडणूक लढवली होती. त्यांनी 10 हजार 231 मते मिळवत राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार जालिंदर शिंदे यांचा पराभव केला होता.विद्यमान आमदार महेश लांडगे आणि माजी आमदार ज्ञानेश्वर लांडगे, विलास लांडे, स्व. सोपानराव फुगे, स्व. मोतीराम पवार यांची निवासस्थाने आणि भोसरी गावठाण परिसर असल्यामुळे विधानसभा मतदार संघासह महापालिका निवडणुकीच्या दृष्टीने सदरचा प्रभाग हा राजकीयदृष्ट्या केंद्रबिंदू आहे. या प्रभागामध्ये भाजपा आणि राष्ट्रवादी यांची ताकद तुल्यबळ आहे.

2017 च्या निवडणुकीत अ- नागरिकांचा मागास प्रवर्ग, ब- सर्वसाधारण महिला, क- सर्वसाधारण- महिला आणि ड- सर्वसाधारण असे आरक्षण होते. ओबीसी आणि सर्वसाधारण समाजाचे प्राबल्य या मतदार संघात आहे.त्यामुळे मराठा आणि माळी कार्ड सर्वाधिक चालेल, असे चित्र आहे.

### पक्षनिहाय इच्छुकांची नावे :

1. **भारतीय जनता पार्टी :** संतोष लोंढे, नितीन लांडगे, सोनाली गव्हाणे, राणी पठारे, अश्विनी फुगे, प्रज्योत फुगे, सुजाता फुगे आदी.
2. **राष्ट्रवादी अ.प. गट :** जालिंदर शिंदे, भिमाबाई फुगे, सोनम गव्हाणे, विराज लांडे आदी.
3. **शिवसेना शिंदे गट :** अद्याप कोणी नाही.
4. **राष्ट्रवादी श.प. गट :** अद्याप कोणी नाही.
5. **शिवसेना उबाठा गट :** अद्याप कोणी नाही.
6. **भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस :** अद्याप कोणी नाही.

### प्रभागातील समाविष्ट भाग :

शितलबाग, सेच्युरी एन्का कॉलनी, सुविधा पार्क, आपटे कॉलनी, सॅन्डविक कॉलनी, खंडोबामाळ, गव्हाणे वस्ती, भोसरी गावठाण, लांडेवाडी, शांतीनगर आदी.

### 2017 मधील विजयी उमेदवार:

अ - संतोष लोंढे - भाजपा

ब - प्रा. सोनाली गव्हाणे - भाजपा

क- भिमाबाई फुगे - भाजपा (आता राष्ट्रवादी अ.प.)

ड - अॅड. नितीन लांडगे - भाजपा.

# अस्मिता खेलो इंडिया किक बॉक्सिंग लीग" मध्ये यशस्वी कामगिरी!

## शिक्षण विश्व: थेरगावच्या न्यू इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थिनींचे यश

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज






**सातारा येथे नुकत्याच पार पडलेल्या अस्मिता खेलो इंडिया किक बॉक्सिंग लीग मध्ये न्यू इंग्लिश मीडियम स्कूल, थेरगावच्या विद्यार्थिनींनी उल्लेखनीय कामगिरी करत पिंपरी-चिंचवड शहराचा झेंडा उंचावला आहे. या स्पर्धेमध्ये शाळेच्या तीन विद्यार्थिनींनी पदक मिळवून आपल्या खेळातील कौशल्याचा ठसा उमटवला.**

स्पर्धेत असावरी राऊत हिने RAUOY पदक, भाग्यश्री गायकवाड हिने रौप्य पदक तर अमृता जाधव हिने कांस्य पदक पटकावले. या कामगिरीमुळे शाळेचा तसेच पिंपरी-चिंचवड शहराचा अभिमान वाढला आहे. ही स्पर्धा सातारा किक बॉक्सिंग संघटनेच्या वतीने, महाराष्ट्र किक बॉक्सिंग संघटना आणि खेलो इंडिया यांच्या मान्यतेने आयोजित करण्यात आली होती.

या विद्यार्थिनी मागील सहा महिन्यांपासून सातत्याने सराव करत होत्या. त्यांच्या अथक प्रयत्नांना यश लाभले असून, त्यांच्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

शाळेचे अध्यक्ष विजय पवार सर यांनी खेळाडूंचे मनःपूर्वक अभिनंदन केले असून, त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. यावेळी सचिव अशोक मोरे , खजिनदार सुरेखा पवार, यांनीही विद्यार्थिनींचे अभिनंदन करत त्यांना प्रोत्साहन दिले. स्पर्धा प्रसंगी महाराष्ट्र किक बॉक्सिंग संघटनेचे अध्यक्ष निलेश शेलार व पिंपरी-चिंचवड किक बॉक्सिंग संघटनेचे अध्यक्ष प्रकाश बोईनवाड हेही उपस्थित होते. या यशस्वी कामगिरीमागे शाळेतील क्रीडा शिक्षक यशवंत माने आणि संदीप माने यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या प्रशिक्षणामुळेच खेळाडूंना ही घवघवीत कामगिरी करता आली. या यशामुळे विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास वाढला असून, त्यांनी भविष्यातही अशाच प्रकारे उल्लेखनीय कामगिरी करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

# अंतिम प्रभाग रचनेकडे इच्छुकांचे लक्ष

## अंतिम प्रभागरचना 22 सप्टेंबरपर्यंत नगरविकास विभागाला सादर करणार

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज




**महापालिका निवडणुकीसाठी जाहीर केलेल्या प्रारूप प्रभाग रचनेवरील हरकती व सूचनांवर गेल्या आठवड्यात सुनावणी झाली. प्रभागरचना अंतिम करून ती २२ सप्टेंबरपर्यंत नगरविकास विभागाला सादर केली जाणार आहे. राज्य निवडणूक आयोगाची अंतिम मंजुरी तीन ते सहा ऑक्टोबर या कालावधीत जाहीर होणार आहे.**

त्यामुळे हरकती व सूचनांनुसार प्रभाग रचनेत बदल होणार की नाही, तसेच अंतिम प्रभाग रचनेकडे इच्छुकांचे लक्ष लागले आहे.

महापालिका निवडणुकीसाठी माजी नगरसदस्यांसह नव्या इच्छुकांनीही आपापल्या भागात फलक लावून जाहिरातबाजी सुरू केली आहे. गणेशोत्सवात सार्वजनिक मंडळे व गृहनिर्माण सोसायट्यांच्या गणेश मंडळांना भेटी देऊन, आरती व विविध स्पर्धांच्या बक्षीस वितरण कार्यक्रमांना हजेरी लावून 'आपण महापालिका निवडणुकीसाठी इच्छुक' असल्याचे अनेकांनी अधोरेखित केले आहे.

निवडणूक विभागाने जाहीर केलेल्या प्रारूप प्रभाग रचनेवर ३१८ हरकती व सूचना प्राप्त झाल्या होत्या. त्यावर गेल्या बुधवारी (ता. १० सप्टेंबर) सहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव तसेच प्राधिकृत अधिकारी प्रवीण दराडे यांच्या उपस्थितीत सुनावणी झाली आहे. त्यास उपस्थित राहून इच्छुक हरकतदारांनी भूमिकाही मांडली. त्यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रत्येक हरकतीवर निर्णय घेऊन १६ ते २२ सप्टेंबर या कालावधीत अंतिम प्रभाग रचना सरकारकडे पाठविण्यात येणार आहे.

### नऊ प्रभागांबाबत हरकत नाही

प्रारूप प्रभाग रचनेनुसार नऊ प्रभागांबाबत हरकती आल्या नाहीत. प्रभाग पाच (भोसरी गवळीनगर, चक्रपाणी वसाहत), प्रभाग १३ (निगडी यमुनानगर), प्रभाग १५ (आकुर्डी प्राधिकरण), १६ (रावेत किवळे मामुर्डी), १७ (दळवीनगर बिजलीनगर वाल्हेकरवाडी), १८ (चिंचवडगाव), २५ (पुनावळे वाकड ताथवडे), २७ (रहाटणी काळेवाडी फाटा), २८ (पिंपळे सौदागर) यांबाबत एकही हरकत आली नाही. सात प्रभागांबाबत प्रत्येकी एक, चार प्रभागांबाबत प्रत्येकी दोन, दोन प्रभागांबाबत प्रत्येकी तीन हरकती प्राप्त झाल्या होत्या.प्रभाग क्रमांक एक मध्ये ८६ आणि १२ अर्जदारांच्या हरकती एकसारख्या होत्या. प्रभाग १० मध्ये ५२, ३८ आणि २२ अर्जदारांच्या हरकती एकसारख्या होत्या. प्रभाग २० मध्ये २९ अर्जदारांच्या हरकती एकसारख्या होत्या.

### सर्वाधिक हरकती प्रभाग क्रमांक नाव

| सर्वाधिक हरकती | प्रभाग क्रमांक | नाव |
|---|---|---|
| ११५ | १० | मोरवाडी-दत्तनगर-संभाजीनगर |
| ९८ | १ | चिखली-जाधववाडी |
| ३१ | २० | संत तुकारामनगर-वल्लभनगर |
| १५ | ७ | भोसरी गावठाण-सँडविक कॉलनी |

Pune District Education Association's
Seth Govind Raghunath Sable
College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.

Pharmacy Council of India | SPPU Affiliation | NAAC Accreditation | Maharashtra State Board of Technical Education

Facilitation & Verification Center for
F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and
Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26

Admission Schedule for
F.Y.B.Pharm

| | |
|---|---|
| Online Registration & Document Upload | 07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM) |
| Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC) | 08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Display of Provisional Merit List | 25 July 2025 |
| Grievance Submission (Online / at FC) | 26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Final Merit List | 31 July 2025 |



Your Trusted Facilitation Centre!

FC Code 6372

Important Note:
- Bring all original + Xerox copies of documents
- Late registrations after 14 July are for Non-CAP seats only

"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"

Confirm Your Application Now!



Visit Us for Physical Scrutiny
PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad
Timings: 10:00 AM – 5:00 PM (including Saturday & Sunday)
Contact: Dr. Nilesh Bhosale – 9860503549


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046